# SHAH CLASSES®

CULTIVATING SUCCESS SINCE 1998

विषय : मराठी
इयत्ता : 10 वी (E.M)

## Prelim Question Paper - 1

एकूण गुण : 80
वेळ: 3 तास

### विभाग 1 : गद्य विभाग

**प्र.1 अ.खालील उताऱ्यांच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** 2

**1) जोड्या लावा**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1.ज्ञानपीठ पुरस्कार | अ. 27 फेब्रुवारी |
| 2.कवीवर्य कुसुमाग्रज | ब. चुरचुरीत संवाद |
| 3.नाटक | क. सामान्यांना प्रेरणा |
| 4. चरित्र | ड.वि.वा.शिरवाडकर |
| | इ. विशाखा काव्यसंग्रह |

**कविता :** 'नटसम्राट'नाटकाचे लेखक वि.वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला आहे.

**सुश्रुतः** खरंच?

**कविताः** कुसुमाग्रजांबरोबरच केशवसुत,बालकवी, बा.भ. बोरकर, बा.सी.मर्ढेकर,शांता शेळके, इंदिरा संत, सुरेश भट, नामदेव ढसाळ,नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला आपल्या प्रतिभेने सजवले. संतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरी काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.

**नाटक :** पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटनाप्रसंग यांमुळे मी मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान मी प्राप्त करतो. तुला माहीत आहे, माझं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे भान ठेवूनच नाटककार माझी मांडणी करतो. वाचनीय अन् प्रेक्षणीय व्हावं अशी त्याची अपेक्षा असते.

**सुश्रुतः** मी कालच एक धमाल बालनाट्य बघितलं. त्यांचं दिग्दर्शन उत्तम होतं. असे बाबा म्हणाले.

**नाटकः** वाऽऽछान! अरे, दिग्दर्शकासाठी मला दिग्दर्शित करणे हा आनंददायी अनुभव असतो. मराठी भाषेत गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, राम गणेश गडकरी, पु.ल.देशपांडे, वसंत कानेटकर, मधुसुदन कालेलकर, प्र.के.अत्रे अशा दिग्गज लेखकांनी मला समर्थपणे हाताळलं.

**चरित्रः** अरे मी ! मी चरित्र. मी एखाद्या थोर व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीचा लेखकावर प्रभाव पाडतो आणि त्याच्या आयुष्याची गाथा लिहिण्याची प्रेरणा लेखकाला मिळते आणि त्यातून मी जन्माला येतो.

**सुश्रुत :** मॅडम नेहमी म्हणतात, की थोरांची चरित्र सामान्यांना प्रेरणा देतात म्हणून.

**2 i) सहसंबंध लक्षात घेऊन वाक्य पूर्ण करा.** 1

नाटकाचं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे..........

**ii) विधान पूर्ण करा.** 1

पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी.....

**3) स्वमत** 3

पुस्तकाशी मैत्री करण्याचे फायदे लिहा.

**(आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1) आकृती पूर्ण करा.** 2

परीक्षा बुडल्याचा निरंजनवर होणारा परिणाम

[ ] [ ] [ ] [ ]

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते.त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपव्द्याप जाणीवपूर्वक केला असता. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळयांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी गाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानात घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास, भडसावळे गुरुजींची मदत बंद, शिक्षणही बंद, रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्यांने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रूळाबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जव केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या. एवढं बोलल्यावर स्टेशनमास्तरांनाही त्याच्या बोलण्यात तथ्य वाटू लागलं. उगाच धोका नको म्हणून गाडी थांबवायला सांगून ते पुलाकडे निघाले. निरंजनने नेमकी जागा दाखवली.

**2 i) वाक्य पूर्ण करा.** 1

नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती तेव्हा-....

**ii) चौकटी पूर्ण करा** 1

१) निरंजनने धावत जाऊन यांना गाठले. - [ ]

२) निरंजन खोटे बोलला तर यांच्या ताब्यात देणार - [ ]

**3) स्वमत** 3

तुम्हाला निरंजनशी मैत्री करायला आवडेल का व त्यांची कारणे लिहा.

## अपठित गद्य

**(इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1) एका वाक्यात उत्तरे लिहा.** 2

1) लेखिका अनेकदा या विवंचनेत असे

i) ..................

ii) .................

2) लेखिकेचे मन कवितेची प्रतिक्रिया देताना म्हणत असे.

i) ...............

ii) ..............

चिंचपोकळीला आल्यानंतर मास्तरांचा दुसरा काव्यसंग्रह 'माझे विद्यापीठ प्रसिध्द झाले. हा काव्यसंग्रह नंतर अनेक विद्यापीठांतून अभ्यासक्रमालाही ठेवला होता. त्यासाठी अनेक कॉलेजांमधून मास्तरांना मुलाखतीसाठी, काव्यवाचनासाठी बोलवलं जायचं.मला गंमत वाटायची आणि कौतुकही. कारण मास्तर स्वत: कधीच कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांची कविता तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. अनेकांची पत्रही यायची मास्तरांना. मास्तर खूप आनंदात असायचे. एखादी नवीन कविता लिहून झाली की मग विचारायलाच नको. त्यांच्या अनेक कवितांची पहिली श्रोता मीच असायची. कविता लिहून झाली की ते मला वाचून दाखवायचे. त्यांनी कविता लिहिल्याचा मलाही आनंद होत असे, पण तो व्यक्त कसा करायचा हे मला समजत नसे किंवा कविता ऐकल्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेही समजत नसे. अनेकदा मी माझ्या संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द माझ्या कानावर पडायचे, पण त्यातचे भाव मात्र मला समजायचाच नाही. एवढ मात्र नक्की की ते लिहीत असताना घरातल्या कोण्त्याच कटकटी मी त्यांच्यापर्यंत न्यायची नाही. आणि माझं मन म्हणायचं, 'कृष्णाबाई' तुला काही कळतंय का त्यातलं? एक तर तू अडाणी बाई, तुला काय समजणार

आहे त्यातलं? बावळटासारखं काहीतरी बोलून उगाच हसं करून घेशील आणि खरंच मला हे उगाचच 'छान आहे',चांगली आहे असे वरवरचं बोलायलाही आवडायचं नाही आणि पटायचंही नाही. त्यापेक्षा गप्प राहिलेलं बरं, असं म्हणून मी माझं काम शांतपणे करत बसायची मास्तरही माझ्या उत्तराची अपेक्षा करीत नसत.

**2 i) योग्य पर्याय निवडा** **1**

कविता ऐकल्यानंतरही मास्तर लेखिकेकडून अपेक्षा करत नसत-

अ) प्रतिक्रियेची ब) उत्तराची क) आनंदाची

**ii) खालील शब्दसमूहांचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.** **1**

मत, अभिप्राय यासाठी उताऱ्यात आलेला शब्द

**विभाग 2 पद्य**

**प्र 2 (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1i) कवितेच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा.** **1**

१) माता धावून जाते- [ ]

२) पृथ्वीवर पक्षीण झेपावते- [ ]

**ii) आकृती पूर्ण करा.** **1**

कवितेत आलेले प्राणी

[ ] [ ]

अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू ॥१॥
तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा॥२॥
सवेंची झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं॥३॥
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे॥४॥
वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी॥५॥
नामा म्हणे मेघा जैसा। विनविती चातक तैसा॥६॥

**2) जोड्या लावा** **2**

| अ - गट | ब - गट |
|---|---|
| i) धेनू | अ. बाळ |
| ii) हरीण | ब. मेघ |
| iii) चातक | क. वासरू |
| iv) आई | ड. पाडस |

**3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा** **2**

i) अंकिला -

ii) सवेंचि -

iii) धरणीं -

iv) वत्सरावें -

**4) काव्यसौंदर्य** **2**

अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू । तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा। या काव्यपंक्तीतील तुम्हाला समजलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**(आ) कवितेसंबंधी खालील मुद्यांना अनुसरून कृती सोडवा.**

**संतवाणी संबंधी कृती सोडवा**

1) प्रस्तुत संतवाणीचे रचनाकार. 1

2) संतवाणीचा विषय. 1

3) खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा. 2

अ) अग्निमाजि पडे बाळू ।
माता धांवें कनवाळू ॥

ब) तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा

4) संतवाणीतून मिळणारा संदेश 2

5) संतवाणी आवडण्याची वा न आवडण्याची कारणे. 2

**किंवा**

हिरवंगार झाडासारखं या कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री 1

2) कवितेचा विषय 1

3) खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा. 2

झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब.

4) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे **2**

5) कवितेतून मिळणारा संदेश **2**

### विभाग 3 - स्थूलवाचन

**प्र.3 खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. 6**

1) 'सूर्य उर्जेचा स्त्रोत' या विषयावर जाता अस्ताला या कवितेच्या आधारे लिहा.

2) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस! या विधानाची यथार्थता लिहा.

3) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना स्पष्ट करा.

### विभाग 4 - भाषा अभ्यास

**प्र. 4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**1) वाक्यांचे प्रकार ओळखा 2**

i) उत्तम नागरिक कोणाला म्हणतात?

ii) चिठ्ठीतला मजकूर ऐकून अब्दुल आणि शत्रूला खूप आनंद झाला.

**2) वाक्यरूपांतर - 2**

i) भाजी शिळी नाही. (होकारार्थी वाक्य करा)

ii) पांढरा रंग सगळ्यांना आवडतो. (प्रश्नार्थी करा)

**3) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त दोन) 4**

1) अंगाचा तिळपापड होणे -

2) वर्ज्य करणे -

3) हातभार लावणे -

**आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**1) शब्दसंपत्ती -**

**१) लिंग बदला 1**

i) मोर - ..............

ii) मित्र - .............

**२) विरूध्दार्थी शब्द लिहा. 1**

i) आशा × ..........

ii) गुण × ...........

**३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. 1**

i) मूर्तीची पूजा करणारा - ..........

ii) सूर्याचा होणारा उदय - ..........

**४) वचन बदला. 1**

i) चूल - ..........

ii) चेहरा - ..........

**2) लेखननियमांनुसार लेखन - 2**

**लेखननियमांनुसार बदल करा.**

1) दोन महीन्यात पन्नास पौंढ वजन कमी करेन

2) बिचारा अतिप्रामानिक!

**3) विरामचिन्हे - 2**

1) चुकीची विरामचिन्हे बदला

किती, सुंदर गाव आहे हे ?

2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.

तुला सांगतो मी पंत 'डाएट कर' बटाटा सोड बटाट्याचं नाव काढू नकोस

### विभाग 5 - उपयोजित लेखन

**प्र. 5 (अ) 1. पत्रलेखन - 6**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

**'जागतिक आरोग्य दिन'**
**'डास निर्मूलन मोहीम'**
या उपक्रमात सहभागी व्हा
**संपर्क**- आरोग्याधिकारी महानगरपालिका,मुंबई

नागरिकांना आवाहन-आपल्या परिसरात कचराकुंड्या स्वच्छ नसतील तर तेथील रहिवाशांनी आरोग्याधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**नगरसेविका या नात्याने**

(अ) कचराकुंड्या व परिसर नियमित स्वच्छ करण्यासाठी महानगरपालिकेला विनंती पत्र लिहा.

(ब) महानगरपालिकेकडे डास निर्मूलन करण्यासाठी मच्छरविरोधी फवारणीची मागणी करणारे पत्र लिहा.


**किंवा**

**2. सारांशलेखन -**

विभाग 1 - गद्य प्र.1 (इ) उतारा वाचा व त्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती करा. 10**

**1. जाहिरातलेखन (60 ते 80 शब्द)**
**खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.**




**2. कथा लेखन (80 ते 100 शब्द)**

**खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**

**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

| |
|---|
| कुरणगावात घडलेली ही कथा. गजधर नावाचा मुलगा आईवडिलांना कामात मदत करत असे. शेती करण्यासाठी सुध्दा मदत करी. शेतीला जोडव्यवसाय म्हणून बकऱ्यांना राखण्याचे काम ते कुटुंब करत असे. त्यांच्याकडे जवळजवळ शंभर बकऱ्या व बकरे होते. त्यांना चरण्यासाठी दूरदूरच्या डोंगरावर तो नेत असे. मुलगा मेहनती होता पण त्याच्यातील अल्लडपणा अजून गेला नव्हता. चेष्टा-मस्करी करण्याची त्याला सवय होती. जवळ काही शेत होते. तेथे शेतकरी आपल्या शेतात काम करत होते. गजधरने एके दिवशी त्यांची गंमत करायचे ठरवले. गजधर अचानक 'लांडगा आला रे लांडगा आला रे' असे ओरडायला लागला. शेतकरी त्याच्या मदतीला धावत आले. पण तेथे लांडगा नव्हता. गजधर टाळ्या वाजवून मोठमोठ्याने हसू लागला. शेतकरी परत गेले. असे शेतकऱ्यांना फसवले, त्याने अनेकवेळा केले, शेतकरी प्रत्येक वेळी मदत करण्यासाठी यायचे आणि हिरमुसले होउन जायचे. |

**3) बातमी लेखन (80 ते 100 शब्द)**

खालील समारंभाची बातमी तयार करा.

शाळेच्या सुवर्ण महोत्सवाचा उद्‌घाटन समारंभ माननीय शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**इ) लेखनकौशल्य** **8**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)**

१)

**अश्वमेध सभागृह**

**दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन**

दि. १५ डिसेंबर ■ वेळ-सं.१० ते रा.८

**प्रमुख पाहुणे - श्रीमती कला परांजपे**

*३५ दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी*

वरील प्रदर्शन पाहण्यासाठी तुम्ही गेला होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**2) खालील मुद्दे विचारात घेऊन 'देशभक्ताच्या पत्नीचे आत्मकथन' या विषयावर आत्मकथनात्मक निबंध लिहा.**

मुद्दे : बालपण - वैवाहिक जीवन- सासू-सासरे, पती यांचा स्वभाव- धैर्याने तोंड देणे- स्वातंत्र्यलढा- सन्मान- जीवनातील सार्थकता.

**3) यंत्र- आमचा मित्र की शत्रू?**

**मुद्दे :** यंत्राचा उपयोग अटळ- दोन्ही बाजूंनी भिन्न विचारसरणी- यंत्राचा शोध लागल्याने बेकारी वाढली- अपघातांचे खरे कारण- उत्पादने वाढले- यंत्र आमचा मित्रच- विकास होतो- नव्या युगात यंत्रशक्ती महत्त्वाची- क्षमता- उपयोग कसा करावा आपल्या हाती- चांगल्यासाठीच उपयोग, मित्र- नाशासाठी उपयोग-शत्रू.

***